# श्री आदिनाथ को-ऑप. बँक लि; इचलकरंजी ची...

## नवी व समृध्द ओळख

SACB
ADINATH BANK
ICHALKARANJI

हे चिन्ह देवी लक्ष्मीचा हात दर्शविते भारतीय परंपरेत लक्ष्मीला संपत्तीची देवी मानली जाते. समृद्धी आणि विपुलतेसाठी देवीचा आशिर्वाद अत्यंत मौल्यवान आहे. तसेच हे आर्थिक भरभराटीचे प्रतिक आहे.

हे चिन्ह पर्वताच्या शिखरासारखे दिसते यातुन असे प्रतित होते की, आदिनाथ बँक नेहमीच ग्राहकांच्या प्रगतीचे कारण बनेल, व ग्राहकांना आर्थिक उपाय प्रदान करून त्यांची जीवन पध्दती प्रगत करण्यास मदत करेल.

हे चिन्ह इंग्रजी अक्षर "A" सारखे देखील दिसते आणि स्पष्टपणे ते आदिनाथ मधील पहिल्या अक्षरासाठी घेतले आहे. हे आदिनाथ बँकेला आपली ओळख प्रस्थापित करण्यास मदत करते, ग्राहकांना फक्त चिन्ह पाहून बँक ओळखण्यास व लक्षात ठेवण्यास सुलभ करेल.

SACB
ADINATH BANK
ICHALKARANJI

लोगोमधील **'SACB'** चा लाँगफॉर्म ***'श्री आदिनाथ को-ऑप. बँक'*** असा आहे.

लोगोमधील फॉन्ट ब्रँडचे व्यक्तिमत्त्व, तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, आभासी प्रभाव, आणि विशिष्ट अक्षरांद्वारे बँकेची ओळख स्थापित करण्यास मदत करते.

बँकेच्या नावाच्या आद्याक्षरासाठी वापरला जाणारा फॉन्ट हा आधुनिक शैलीचा वापरल्याने आपली बँक ॲडव्हान्स विचारसरणीची आहे हे यावरून दिसून येते.

सामान्य लोकांना योग्य आर्थिक मार्गदर्शन प्रदान करून त्यांचे भविष्य उज्ज्वल बनवण्यासाठी वचनबद्ध आहे हे सुध्दा दिसुन येते.

आदिनाथ या नावासाठी सिम्पल व सोप्या फॉन्टचा वापर केला आहे जेणे करून सहज वाचता येईल व बँकेची स्वच्छ कार्यप्रणाली प्रतित व्हावी .

**लोगोमधील रंग विशिष्ट भावना जागृत करतात, ब्रँडची ओळख प्रस्थापित करतात, ओळख वाढवतात, आणि ब्रँडची मूल्ये दर्शवितात.**

**लाल रंग** विश्वास आणि स्थिरता दर्शवितो. बँकिंग उद्योगात, हे गुण अत्यंत मौल्यवान आहेत हे ग्राहकांना त्यांच्या आर्थिक बाबी सुरक्षित असल्याचा विश्वास देतात.

**निळा रंग** हा साहस, बुद्धिमत्ता आणि कार्यक्षमतेशी संबंधित असतो. आदिनाथ बँक ही धोरणात्मक विचार, योग्य निर्णय, उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन आणि कार्यक्षम सेवा प्रदान करण्यासाठी सक्षम आहे हे निळ्या रंगातून अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे.